**ठळक बातम्या**

- जपानबरोबर संरक्षणविषयक सहकार्याला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांचं प्रतिपादन

- केंद्रीय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षिण क्षेत्रीय परिषदेची एकतिसावी बैठक चेन्नईजवळ कोवलम इथं सुरु

- माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

- सहा फुटांपेक्षा उंच पीओपी गणेशमूर्तींचं विसर्जन यंदा नैसर्गिक जलस्त्रोतांमधे करायला मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी

**आणि**

- बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन स्पर्धेत भारताची त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीचा महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

भारत आणि जपानच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत भाग घेण्यासाठी जपानचे संरक्षणमंत्री शिंजेरियो कोईझुमी सध्या भारत दौऱ्यावर आले आहेत. काल त्यांनी मुंबईत पश्चिम नौदलाचं मुख्यालय आणि आयएनएस चेन्नई या युद्धनौकेला भेट दिली. नवी दिल्ली इथं युद्धस्मारकावर आज त्यांनी पुष्पचक्र अर्पण करुन शहीद जवानांना आदराजंली वाहिली. कोईझुमी यांना माणेकशॉ मैदानावर पारंपरिक लष्करीमानवंदना देण्यात आली. बैठकीपूर्वी संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी कोईझुमी यांचं स्वागत केलं. जपानच्या कुमामोतो प्रांतात अलिकडेच आलेल्या भूकंपात झालेल्या विनाशाबद्दल सिंग यांनी दुःख आणि सहवेदना व्यक्त केल्या, तसंच भारताकडून हरप्रकारे मदतीचं आश्वासन दिलं. भारतानं आतापर्यंत दिलेल्या पाठिंब्याबद्दल कोईझुमी यांनी आभार मानले.

या बैठकीत भारत आणि जपानदरम्यान संरक्षण विषयक सामुग्रीचं आदान प्रदान, परस्पर विश्वासाच्या वातावरणावर भर आणि हिंद प्रशांत महासागर क्षेत्रात स्थैर्य आणि

सुरक्षितता स्थापित करणं या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. जपानबरोबरच्या संबंधांना अनन्यसाधारण महत्त्व असल्याचं राजनाथ सिंग म्हणाले.

**- - - होल्ड- बाईट- - -**

**- <><><><><>**

अर्थमंत्री निर्मला सीतारमन परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर , वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांची आज भेट घेतली. इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री जितिन प्रसाद सुद्धा यावेळी उपस्थित होते. या भेटीदरम्यान द्विपक्षीय आर्थिक सहकार्य, डिजीटलायझेशन, कौशल्य विकास आणि शाश्वत विकास या बाबतीतल्या धोरणांची आखणी तसंच अंमलबजावणी यासंबधी चर्चा झाली.

**- <><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दक्षिण क्षेत्रीय परिषदेची एकतिसावी बैठक आज चेन्नईजवळ कोवलम इथे होत आहे. या परिषदेला तमिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय, कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, केरळचे मुख्यमंत्री सतीशन, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू तसंच तेलंगणाचे उपमुख्यमंत्री, पुदुच्चेरी तसंच अंदमान-निकोबार बेटांचे नायब राज्यपाल, लक्षद्वीपचे प्रशासक आणि विविध मंत्रालयांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत. या बैठकीत राष्ट्रीय महत्त्वाच्या व्यापक मुद्द्यांवर चर्चा सुरू आहे. यामध्ये महिला आणि मुलांवरच्या बलात्काराच्या प्रकरणांचा जलद तपास आणि त्वरित निपटारा करण्यासाठी फास्ट ट्रॅक विशेष न्यायालयं स्थापन करण्याच्या अंमलबजावणीचा तसेच शिक्षण आणि इतर संबंधित मुद्द्यांचा समावेश आहे.

याशिवाय आंतर-राज्य सहकार्य, आर्थिक विकास, औद्योगिक गुंतवणूक, भागीदारी बळकट करणं, पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण, आरोग्य सेवा, माहिती तंत्रज्ञान, आपत्ती व्यवस्थापन, गुन्हे प्रतिबंध आणि सीमावाद यांसारख्या विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर बैठकीत चर्चा होणार आहे.

**- <><><><><>**

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन यांनी आज आदरांजली वाहिली. देशसेवा आणि सार्वजनिक जीवनात राजीव गांधी यांनी

दिलेल्या योगदानाची आठवण राधाकृष्णन यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात करुन दिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीसुद्धा दिवंगत राजीव गांधी यांना आदरांजली वाहिली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनीही आज लोकभवनात राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. उपस्थित अधिकारी, कर्मचारी तसंच पोलिस अधिकारी आणि जवानांना त्यांनी यावेळी सद्भावना प्रतिज्ञा दिली.

राजीव गांधी यांचा जन्मदिवस सद्भावना दिन म्हणून पाळला जातो.

**- <><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या १९७८च्या निकालामधली उद्योग या शब्दाची कामगारस्नेही आणि व्यापक व्याख्या २०२०च्या औद्योगिक संबंध संहितेचा अर्थ लावताना वापरली जाऊ नये, असा निकाल सर्वोच्च न्यायालयानं आज ६ विरुद्ध ३ अशा बहुमतानं दिला. १९७८च्या निकालाचा पुनर्विचार करायची गरज योग्य असल्याचंही सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्यासह ९ न्यायाधीशांच्या घटनापीठानं सांगितलं. २१ फेब्रुवारी १९७८ रोजी सर्वोच्च न्यायालयानं उद्योग या शब्दाची व्याख्या आणखी समावेशक करून रुग्णालयं, शिक्षणसंस्था, क्लब, सरकारचे कल्याणकारी विभाग अशा आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या लाखो कर्मचाऱ्यांना औद्योगिक तंटा कायदा १९४७चं संरक्षण दिलं होतं. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी असहमती दर्शवणारा निकाल दिला. हे प्रकरण ९ न्यायाधीशांच्या पीठाकडे देण्याची मागणी विचारात घेण्याजोगी नाही, असं मत या तीन न्यायाधिशांनी नोंदवलं.

**- <><><><><>**

दिल्लीचे नायब राज्यपाल तरणजीत सिंह संधू यांनी आज आगामी ब्रिक्स परिषदेच्या तयारीची आढावा बैठक घेतली. येत्या १२ ते १३ सप्टेंबर रोजी ही बैठक होणार आहे. या परिषदेदरम्यान विविध संबंधित संस्थांमध्ये उत्तम समन्वय आणि कामं वेळेत पूर्ण करायची गरज अधोरेखित केल्याचं संधू यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं. ब्रिक्सचं अध्यक्षपद यंदा भारताकडे असून या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना ‘लवचिकता, नवोन्मेष आणि शाश्वततेसाठी उभारणी’ असा आहे.

**- <><><><><>**

प्लास्टर ऑफ पॅरिसपासून तयार केलेल्या सहा फुटांपेक्षा उंच गणेशमूर्तींचं नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करायला मुंबई उच्च न्यायालयाने आज अंतरिम परवानगी दिली. मात्र, या प्रकरणी दाखल झालेल्या याचिकेवरचा निर्णय न्यायालयाने राखून ठेवला आहे. निर्णय जाहीर होईपर्यंत २४ जुलै २०२५ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल, असं न्यायालयाने स्पष्ट केलं. या आदेशानुसार, सहा फुटांपर्यंतच्या गणेशमूर्तींचं कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करणं बंधनकारक करण्यात आलं होतं, तर सहा फुटांवरच्या गणेशमूर्तींचं नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करायला परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे यंदा पीओपीच्या उंच गणेश मूर्तींचं विसर्जन नैसग्रिक स्त्रोतांमधे करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

- <><><><><>

नवी दिल्लीत सुरू असलेल्या बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताची त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यांनी जपानच्या सातव्या मानांकित रिन इवानागा आणि किए नाकानिशी या जोडीवर २१-१६, २१-१२ अशी थेट गेम्समध्ये मात केली.

- <><><><><>

अँटिका सिंगापूर आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत मोहित जगलान आणि लक्षिता जगलान या जोडीनं मिश्र दुहेरीच्या उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. सिंगापूरच्या ग्वान यु ताईन आणि जेसी बॅचलर या जोडीने माघार घेतल्यानं या भावंडांना सरळ उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश मिळाला आहे.

- <><><><><>

एनआरसी अर्थात राष्ट्रीय नागरिक नोंदणीच्या मागणीवरून मणिपूरमध्ये सुरू असलेल्या आंदोलनामुळे राज्यातल्या सर्व शाळा आणि विद्यापीठं बंद ठेवण्याचे आदेश राज्य सरकारने जारी केले आहेत. हे आदेश आजपासून २२ ऑगस्टपर्यंत लागू असतील. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर इम्फाळ पश्चिम जिल्ह्यात सुरू असलेला जनगणनेशी संबंधित प्रशिक्षण कार्यक्रमही २८ ऑगस्टपर्यंत स्थगित करण्यात आला आहे. 'कॅम्पेन फॉर जस्ट अँड फेअर डिलिमिटेशन' या संघटनेने राज्यात जनगणना सुरू होण्यापूर्वी एनआरसी अद्ययावत करण्याच्या मागणीसाठी ४८ तासांच्या संपाची हाक दिली होती.

- //<><><><><>//